ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 8 | ISSUE - 6 | FEBRUARY - 2022

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# मूल्यशिक्षण एक अभ्यास




प्रा.डॉ.एस.एस.इंगोले
श्री तुळशिरामजी जाधव कला व विज्ञान महाविद्यालय वाशिम.

मानवी उत्क्रांतीवादाचा विचार केला तर आपल्याला असे दिसेल की प्राचीन काळापासून मानव आपल्या मूलभूत गरजा भागवत होता. या गरजा भागविण्यासाठी त्याने निसर्गामध्ये असलेल्या गोष्टींचा उपयोग करून घेतला. या गरजा पूर्ण करण्यासाठी त्याने आपल्याकडे उपजत असलेल्या बुद्धीचा आणि कौशल्याचा वापर करून घेतला. आणि कालांतराने मानवाने आपल्या मूलभूत गरजा भागविण्याच्या विकासाबरोबरच सांस्कृतिक, शिष्टाचार, शिक्षण, तत्वज्ञान या संकल्पना निर्माण झाल्या. या संकल्पना परिपूर्ण करण्यासाठी जीवन मूल्य ही संकल्पना साकार झाली. काळाच्या ओघात मध्ये मानवाने पृथ्वीवरील सर्व साधनसामग्रीचा उपयोग करून आधुनिक विकास घडवून आणला. आजच्या एकविसाव्या शतकात मानवाने आश्चर्यकारक प्रगती केली. मानवाने मानसाला जोडण्यासाठी मोठ्या प्रमाणात संसाधने निर्माण केली. आज अमेरिकेमध्ये घडणारी घटना आपल्याला अगदी थोड्या वेळात कळते त्यामुळे असे दिसून येते की जग जुळल्या गेले परंतु या जग जुळण्याच्या साधनांनी माणूस माणसापासून दूर गेलेला दिसून येतो. या एकाकीपणामधून दुर्वर्तन, व्याभिचार, अनैतिकता, व विध्वंस यासारखे प्रकार नेहमी वाचनात, पाहण्यात येतात. यामधून भविष्यात मानवी जीवन सुरक्षित असेल की नाही याची भयावहता माणसाच्या मनामध्ये येते. आज आपला देश मोठ्या प्रमाणात प्रगती करतांना दिसतो मोठ्या क्षेत्रात माणव आपली भुमिका चांगली बजावत आहे.परंतु हे असून भारतात गुन्हेगारीचा आलेख मोठ्या प्रमाणात वाढतो आहे. त्यामुळे एकीकडे विकास आणि दुसरीकडे गुन्हेगारी अशा दोन गोष्टी एकाच वेळी अस्तीत्वात आहेत. त्यामुळे संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे. ती म्हणजे खरच आपण विकसीत आहोत काय. या दोन गोष्टी एकाच वेळी किती काळ राहू शकतील आणि गुन्हेगारी अशीच वाढत राहील. तर भारताचा विकासाचा आलेख खाली घसरल्याशिवाय राहणार नाही.

## मूल्यांचा अर्थ :-

मानवी जीवनात मूल्य अतिशय महत्त्वाचे आहेत. ही मूल्यसंस्कार काळाच्या ओघात निर्माण झाली, समृद्ध झाली. याच मुल्याने मानव जीवनात इतरांना आदर्श ठरत असतो. ही मूल्य रुजविण्यासाठी शिक्षक, विद्यार्थी आणि समाज हे महत्त्वाचे घटक आहेत. त्यामुळे मूल्य म्हणजे काय ते समजून घेणे गरजेचे आहे. मूल्य संज्ञेने शैक्षणिक संदर्भात स्वयंसिद्ध आणि इष्ट अशा ध्येयांचा आदर्शाचा निर्देश केला आहे. मूल्य शिक्षण म्हणजे नैतिक, बौद्धिक अथवा सौंदर्यविषयक दृष्टिकोनातून आपल्याला ज्या बदलाची पसंती जाणवते ते शिक्षण होय. ज्या शिक्षणातून मूल्यांची रुजवणूक (संस्कार)केले जातात, त्या शिक्षणाला मूल्यशिक्षण असे म्हणतात.

दैनंदिन जीवनात मूल्य हा शब्द आपण किंमत या अर्थाने घेत असतो. अर्थशास्त्रामध्ये किंमत पर या अर्थाने मूल्य हा शब्द वापरण्यात येतो. मूल्य म्हणजे मानवाचे दैनंदिन जीवन नियंत्रित करणारा घटक होय.

मानव हा समाजशील प्राणी आहे. आणि या समाजात राहत असतांना समाजाने मानवासमोर काही आदर्श निर्माण केला आहेत. हे आदर्श म्हणजे सामाजिक मूल्य आहेत. अशी मुले विद्यार्थ्यावर शिक्षणाच्या माध्यमातूनच चांगल्या प्रकारे केली जातात. त्यामुळे आजच्या काळात मुल्यशिक्षणाची गरज मोठ्या प्रमाणावर जाणवते.

### मूल्य शिक्षणाची उद्दिष्टे :-

प्राचीन काळापासून भारतातील शिक्षण व्यवस्था अतिशय संपन्न होती. तक्षशिला, नालंदा वल्लभी,कांची यासारखी विद्यापीठे भारतात शिक्षण देण्याचे महान कार्य करीत होती. तत्वज्ञान, धर्मशास्त्र, नितीशास्त्र, इतिहास, ज्योतिष अशा विविध विषयाचे अध्ययन व अध्यापन या विषयामधुन करित असत. हे करित असतांना समाज, देश, समृध्द झाला पाहीजे हा या शिक्षणाचा मुल्यआधार होता. यासाठी शिक्षणाची काही उदिष्ठे पुढील प्रमाणे सांगता येतात.

१) साधी राहणी उच्चविचारसरणी
२) संस्कृतीचे रक्षण आणि संवर्धन
३) सामाजिक व नागरीक जबाबदारीची जाणीव
४) चारित्र्य संपन्न्ता
५) समान वागणुक

ही उद्दिष्टये भारताच्या संदर्भात आजही महत्वाचे आहेत. आणि आजच्या शैक्षणीक पध्दतीतुन ती राबविण्याचा प्रयत्न केला जातो.

### मूल्यशिक्षणात शिक्षकांची भूमिका :-

भारतामध्ये बालक केंद्रित शिक्षणात शिक्षकाचे महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे आज एखादा विद्यार्थी सुशिक्षित होऊन चालणार नाही तर तो सुसंस्कृत झाला पाहिजे. आणि ही किमया फक्त शिक्षकच चांगल्याप्रकारे करू शकतो. कारण विद्यार्थ्यावर आपल्या शिक्षकाचा मोठा प्रभाव असतो. जगात शांतता असो की युद्ध असो त्याचा प्रेरणा विद्यार्थांना शिक्षणाच्या ठिकाणीच दिल्या जातात. शिक्षकांची भूमिका समाज, देश आणि विश्वबन्धुत्व निर्माण करण्यात महत्त्वाची आहे. म्हणून शिक्षक हा एखादा रथाचा सारथ्या सारखा असतो. असा सारथी देशाला पुढे नेऊ शकतो आजच्या स्थितीत एखादा देशाला नष्ट करायचे असेल तर त्या देशावर प्रत्यक्ष अनुबाँब टाकण्याची आवश्यकता नाही. तर त्या देशाची शिक्षण व्यवस्था कमकुवत केली, तरी तो देश आपोआपच ढासळून जाईल.

भारतासारख्या अनेक विविध धर्म, जाती, पंथ असलेल्या देशात शिक्षकाची महत्त्वाची भूमिका आहे. भारताला मजबूत अशी समृद्ध शांतताप्रिय देश करायचा असेल तर शिक्षक सर्वधर्मसमभाव, समानता, लोकशाही, बंधुता, स्वतंत्र या तत्त्वाचा आदर करणारा आवश्यक आहे .त्यामुळे भारताला यादवी युद्ध आणि बुद्ध या कडे नेणारा घटक शिक्षकच असणार आहे.

### शैक्षणिक मूल्ये :-

शिक्षणाच्या माध्यमातून सुसंस्कारित नागरिकांची घडणं होऊ शकते. त्यामुळे शिक्षण केंद्र हे संस्कार केंद्र आहेत. असे म्हणता येते. या संस्कार केंद्रातून भारताच्या भविष्याची जडणघडण होते. त्यामुळे भारत सरकारने नैतिक आणि मूल्य शिक्षणावर भर दिलेला आहे. महाराष्ट्र राज्य सरकारने शिक्षणामध्ये दहा प्रमुख मूल्य जतन करण्याचा प्राधान्य दिले आहे. त्यामध्ये वक्तशीरपणा, सर्वधर्मसहिष्णुता, वैज्ञानिक दृष्टिकोण, नीटनेटकेपणा, राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, सौजन्यशिलता, संवेदनशिलता, क्षमाशीलता, श्रमप्रतिष्ठा यांचा समावेश होतो. वरील दहा मूल्याच्या आधारे विद्यार्थ्यांचे जीवना कारण होते. विद्यार्थ्यांमध्ये वक्तशीरपणा असला पाहिजे त्याला वेळेचे महत्त्व लक्षात आसले पाहिजे. भारतासारखे अनेक धर्म असलेल्या

देशात सर्वधर्मसमभाव ही भावना आवश्यक आहे. भारतीय समाजात मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा, आजच्या स्थितीत आढळून येतात. त्यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन या मूल्यांची रुजवणूक कितपत होते, याविषयी शंका उत्पन्न होते. विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्व कळले पाहिजे. कारण या विश्वातील मोठे बदल यामागे मोठे श्रम असतात. एखाद्या व्यक्ती मोठा होतो, मोठ्या पदावर जातो त्या मागे त्याचे श्रम असतात. ही जाणीव विद्यार्थ्यांना असली पाहिजे. आणि यामधून राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्रभक्ती निर्माण होईल.

## भारतात मूल्यशिक्षणाचे महत्व:-

आजच्या गतिमान जगात मानवी जीवन गुरफटलेले आहे. रोजच्या जीवनात लागलेले शोध, बदल मानवी जीवनाला प्रभावित करीत आहे. त्यामुळे विकासातून मिळणारी भौतिक समृद्ध यालाच मानवाने आपले खरे जीवन मानले आहे. अशा वस्तूची प्राप्ती म्हणजे जीवन अशा समज आज समाजामध्ये मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे भारतात चोरी, खुन, अत्याचार सामाजिक, धार्मिक, पिळवणूक अशा घटना नित्याचे झाले आहेत. विद्यार्थी विविध आनंद साजरा करण्याच्या इच्छेने व्यसनांमध्ये गुरफटले आहेत आनंद व दुःखाच्या वेळी मदिरा प्राशन केले पाहिजे असा समज वाढत आहे. यामधून अनेकविध गुन्हे गुन्हेगार जन्म घेत आहेत. असत्याच्या मार्गाने जाणारे लोक मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामधून नैराश्य, आत्महत्या, यासारखे प्रकार घडत आहेत विद्यार्थी मानसिक दृष्ट्या दुर्बल होत आहे. विभक्त कुटुंब पद्धती ने कुटुंबात वडीलधारी माणसे नसतात, वृद्धाश्रमांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या समस्यावर भारताला मात करायची असेल असेल तर मूल्य संस्कार आवश्यक आहेत आणि त्यासाठी मूल्यावर आधारित शिक्षण आवश्यक आहे. त्याशिवाय भारतातील समृद्ध संस्कृती विचार आचार राष्ट्रीय एकात्मता कायम राहणार नाही.

## समारोप:-

विश्वामध्ये भारताच्या भूमिकेने पहिले एवढे स्थित्यंतरे जगातील कोणत्याही भूमिकेने पाहिले नसतील,या भूमीने या भूमीवर विविध संस्कृतीचे आक्रमणे झालीत अनेक संस्कृती भारतात समाविष्ट आल्या तर काही संस्कृती आजही आपले वेगळेपण जपण्याचा प्रयत्न करीत आहेत या विविध संस्कृतीच्या मिश्रणातून भारतीय संस्कृती समृद्ध झाली आहे परंतु आज भारतासमोर तीच संस्कृती टिकविण्याचे आव्हान निर्माण होत आहे अशा आव्हानावर मात करून भारतीय एकता अखंडता समानता लोकशाही टिकविण्याची असेल तर आदर्श मूल्यांची रुजवणूक गरजेची आहे अशी मूल्ये भारतीय समाजात रुजवायची असेल तर शिक्षणाच्या माध्यमातून मूल्यांचे संस्कार करणे आवश्यक आहेत म्हणजेच मूल्यशिक्षण आवश्यक आहेवाय दुसरा प्रभावी माध्यम दिसून येत नाही प्रांतिक शोधाच्या माध्यमातून मूल्यांची रुजवणूक व्हावी अशी अपेक्षा पूर्ण

## संदर्भ

१) गावंडे एकनाथ ना., झोंबाडे वर्षा शरद., मूल्याधिष्ठित शिक्षण प्रक्रिया आणि उपचार ' निर्मल प्रकाशन अमरावती
२) बोरकर विष्णू., मुल्यशिक्षणाची गुरुकिल्ली., गाज प्रकाशन., नगर.
३) पाटील प्रिती., शेवणेकर शारदा., भारतीय शिक्षण प्रणालीचा विकास., फडके प्रकाशन कोल्हापूर
४) लिमये क्षमा.,' मूल्यशिक्षण'